**राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालय व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण (L.L.M.) घेतलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना ३ आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्र. औन्यामुं-०५२३/प्र.क्र.९३/काम-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ मार्च, २०२४

**वाचा :-** १. विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.एचसीटी-२००८/४२७/प्र.क्र.३५८/का.तीन, दि.०१/०८/२०१७

२. विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.एचसीटी-२०१८/१३३/प्र.क्र.४३/का.तीन, दि.२४/०३/२०२३.

३. उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. औन्यामुं-०८१७/प्र.क्र.११०/काम-६ दि. १८ जून, २०१९

**प्रस्तावना :-**

मा.न्या. शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार विधि शाखेतील पदव्युत्तर शिक्षण (L.L.M.). घेतलेल्या राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना तीन आगाऊ वेतनवाढीचा लाभ विधी व न्याय विभागाच्या दिनांक ०१.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करण्यात आला होता. याच धर्तीवर राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालय व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना हे लाभ मंजूर करण्याबाबत शासन निर्णय दि. १८ जून २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला होता. आता विधी व न्याय विभागाच्या दि. १.०८.२०१७ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनेक न्यायालयीन प्रकरणे व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. ९२७/२०१८ मधील दि.१०.११.२०१८ रोजीच्या आदेशानुसार व मा सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्रमांक १०४१/२०२० व ६३४२/२०२० मधील दिनांक ३०.०९.२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार आणि भारत कुमार शांतीलाल ठक्कर विरुद्ध गुजरात राज्य व इतर (रिट याचिका (सी.) क्र. १९/२०१२) मधील दिनांक ०१.०४.२०१४ च्या आदेशानुसार संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयाऐवजी विधी व न्याय विभागाने संदर्भित क्र. २ नुसार सुधारित शासन निर्णय दि. २४ मार्च २०२३ रोजी निर्गमित केला आहे. त्याच धर्तीवर या विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयाऐवजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

**शासन निर्णय :-**

राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालय व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील ज्या न्यायिक अधिकाऱ्यांनी सेवेत येण्यापूर्वी किंवा सेवेत आल्यानंतर कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण (L.L.M.)

ही पदवी धारण केलेली असेल तर त्यांना ३ आगाऊ वेतनवाढीचा लाभ देय आहे व तो लाभ देण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे.

२.

| अ.क्र. | ३ आगाऊ वेतनवाढी देण्याची कार्यपध्दती | |
|---|---|---|
| १ | न्यायिक अधिकारी सेवेत नियुक्त होणेपूर्वी कायद्यांचे पदव्युत्तर शिक्षण (L.L.M.) ही पदवी धारण केलेली असल्यास, | दि. ०१.११.१९९९ रोजी न्यायिक अधिकारी म्हणून ज्या वेतनश्रेणीत कार्यरत होते त्या वेतनश्रेणीवर ३ आगाऊ वेतनवाढीचा लाभ देऊन वेतन निश्चिती करण्यात यावी. |
| २ | १.११.१९९९ नंतर न्यायिक अधिकारी म्हणून सेवेत नियुक्त झाले होते व नियुक्त होण्यापूर्वी विधि शाखेतील पदव्युत्तर शिक्षण (L.L.M.) ही पदवी धारण केलेली असल्यास, | ज्या पदवर न्यायिक अधिकारी म्हणून प्रथम नियुक्त झालेले आहे त्या दिनांकाला त्या पदावर घेत असलेल्या वेतनश्रेणीत ३ आगाऊ वेतनवाढीचा लाभ देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी. |
| ३ | दि. १.११.१९९९ नंतर न्यायिक अधिकारी म्हणून सेवेत नियुक्त झाल्यानंतर विधि शाखेतील पदव्यूत्तर शिक्षण (L.L.M.) ही पदवी धारण केलेली असल्यास, | ज्या दिनांकाला सदर अधिकाऱ्याने विधि शाखेतील पदव्यूत्तर शिक्षण (L.L.M.) ही पदवी धारण केली त्या दिनांकाला तो कार्यरत असलेल्या पदावर घेत असलेल्या वेतनश्रेणीत ३ आगाऊ वेतनवाढीचा लाभ देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी. |

३. उपरोक्तप्रमाणे ३ आगाऊ वेतनवाढी देताना आश्वासित प्रगती योजनेचा / पदोन्नतीचा / निवडश्रेणी / उच्च समयश्रेणी यांचा लाभ दिला असल्यास त्या त्या वेतनश्रेणीत/वेतनस्तरावर पुन्हा ३ आगाऊ वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय राहील.

४. राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालय व श्रमिक भरपाई आयुक्त कार्यालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना ३ आगाऊ वेतनवाढी देण्याबाबतचा खर्च संबंधित न्यायिक अधिकारी घेत असलेल्या वेतनावरील लेखाशिर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. उपरोक्त ३ आगाऊ वेतनवाढीचा लाभ हा दि.०१.११.१९९९ पासून देय आहे व त्याबाबतची थकबाकी रोखीने अदा करण्यात यावी.

६. या विभागाचा शासन निर्णय क्र. औन्यामुं-०८१७/प्र.क्र.११०/काम-६ दि. १८ जून, २०१९ याद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७/२०२३/वित्त विभाग/व्यय-१६, दिनांक ०२.०२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३१३११०६४५२५१० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c9638764849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2024.03.13 12:29:15 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत –**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
२) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) महाप्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
४) अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई,
५) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई,
६) सह सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई
७) प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई,
८) महालेखापाल-१/२, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
९) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई,
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१२) विधी व न्याय विभाग, कार्यासन-३, मंत्रालय, मुंबई,
१३) निवड नस्ती (कामगार-६).